जिल्हा उद्योग केंद्र,नांदेड.

महाराष्ट्र शासन

**कार्यालय महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड.**

उद्योग भवन, पहिला मजला, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड- 431602

(02462) (250056) Email: didic.nanded@maharashtra.gov.in

जा.क्र.जिउकेनां/जिनिस/2023/ दिनांक :

## महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषदेतंर्गत जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि. 10.08.2023 इतिवृत्त

महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषदेतंर्गत जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि. 10.08.2023 रोजी सायं. 5.00 वा. मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे संपन्न झाली. सभेस सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते. श्री. अमोल इंगळे, महाव्यवस्थापक यांनी उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत करुन जिल्हयात आर्थिक वर्ष 2022-2023 मध्ये 71.5% निर्यात वृध्दी नोंदविली गेली असल्याचे नमूद करुन चालू वर्ष 2023-2024 मध्ये 80% निर्यात वृध्दी करण्याचे लक्ष्य ठरविले आहे असे सांगितले. मा. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या दि. 3.8.2023 रोजीच्या अर्धशासकीय पत्रातील 10 कलमी कार्यक्रमातील कृतीमुद्दयानुसार, मा. जिल्हाधिकारी, परिषदेतील सदस्य व जिल्हयातील निर्यातदार उद्योजकांशी अमलबजावणीसाठी चर्चा करण्यात आली.

1. District Export Plan : मा. अध्यक्षांनी नांदेड जिल्हयात होत असलेल्या निर्यातीबाबत चर्चा करुन झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला.

2. Diversification Programme : नांदेड जिल्हयातील निर्यातीमध्ये विविधता आणण्यासाठी सोयाबीनवर आधारीत उत्पादने, शेवगापासून मोरींगा पावडर तसेच हळदीपासून क्युमीन तयार करुन त्याच्या निर्यातीवर भर देण्याचे ठरवण्यात आले.

3. Institutional Support : जिल्हयातील एम.जी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, इंदिरा इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट व शरदचंद्र आर्टस, कॉमर्स व सायन्स कॉलेज, नायगांव या शैक्षणिक व तांत्रिक संस्थेसोबत सामंजस्य करार (MoU) करुन घेतल्याची माहिती सभागृहास देण्यात आली.

2 . . .

Scanned with OKEN Scanner

4. Knowledge Partnership : जिल्हयातील बाजारपेठेमधील निर्यातक्षम उत्पादित मालाच्या तसेच नवीन उत्पादित मालाच्या प्रतवारीवरुन श्रेणीवाढ, गुणवत्तावाढ तसेच पॅकींग, विक्रीसाठी/मार्केटींगसाठी,APEDA, DGFT आणि Export Promotion Councils (EPCs) या संस्थांसोबत समन्वय, सहभाग व सहकार्यासाठी तसेच बाजारपेठेत उद्‌भवणा-या अडचणी/बाबीच्या सोडवणूकीसाठी प्रयत्न करत असल्याची माहिती सभागृहास देण्यात आली.
5. Capacity Building : जिल्हा उद्योग केंद्रामार्फत वेळोवेळी निर्यात जागरुकता चर्चासत्रे आणि कार्यशाळा आयोजित करुन त्यातंर्गत शेतमाल निर्यातीबाबत शेती योजनेची माहिती शेतकरी व निर्यातक्षम उद्योजकांना दिली जाते.
6. Quality Testing & Certification Lab : फुड प्रोसेसिंग क्लस्टरचा निदानोपयोगी अहवाल (DSR) मंजूर करण्यात आला असून जेव्हा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजूर होईल तेव्हा Fruit Juice Testing Labortaory आणि कोल्ड स्टोअरेजची स्थापना केली जाईल. तसेच मिरची पावडर क्लस्टरमध्ये DSR मंजूर झाला असून जेव्हा DPR मंजूर होईल तेव्हा मिरची पावडर चाचणी प्रयोगशाळा स्थापना केली जाईल.
7. Market Enhancement Programme : याद्वारे सर्व निर्यातदारांना ट्रेड फेअर कॅलेंडर दिले आहे तसेच कार्यालयात निर्यात कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे.
8. Technology Upgradation Support : E-Commerce Platform शी Export Potential असलेल्या वस्तूंचे Promotion करण्यासंदर्भात Collaboration करण्यासाठी सभेत चर्चा करण्यात आलेली आहे.
9. Credit Linkage Support : जिल्हयातील बँकांनी निर्यातदारांसाठी Forex सुविधा सुरु केली आहे.
10. Promoting "BRAND MAHARASHTRA" : मा. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार "BRAND MAHARASHTRA" प्रमोट करण्यासाठी District Export Summit तसेच District Investor Summit चे येत्या काळात नियोजन करुन विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर,शेवटी उपस्थितांचे आभार व्यक्त करुन सभा संपन्न झाली.

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड.
तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती,नांदेड.

मा. जिल्हाधिकारी,
नांदेड. तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नांदेड.

Scanned with OKEN Scanner